# फेस टू फेस मोफत कौन्सिलिंग

नैराश्य आणि अपयशाने खचलेल्या व्यक्तींना मदत देण्यासाठी हेल्पलाइनसोबत दिवसरात्र फेस टू फेस कौन्सिलिंग असा उपक्रम वांद्रेवाला फाउंडेशनने मेंटर हेल्थ इनिशिएटीव्ह इंडियातर्फे सुरू करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत २५७०६००० ही हेल्पलाइन सुरु करण्यात आली असून, ऑगस्टमध्ये सुरू झालेल्या या हेल्पलाइनला सध्या दिवसाला दीडशेपर्यंत कॉल येतात. फोनवरून बोलणाऱ्या कौन्सिलिअर्सशी थेट संवाद साधण्याची इच्छा अनेकांनी बोलून दाखवली. समोरासमोर बोलण्याची गरज लक्षात आल्यानंतर पवईच्या हिरानंदानी हॉस्पिटलमध्ये काउन्सिलिंग सेंटर उघडण्यात आले आहे, अशी माहिती कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. अरूण जॉन यांनी दिली. हे कौन्सिलिंग पूर्णतः मोफत असेल.

शहरी वातावरणातील अस्थिरता आणि नात्यांमधील वाढती तेढ यामुळे अनेकांचे मानसिक आरोग्य बिघडतें. काही वेळा फोनवरून मार्गदर्शन करणं पुरेसं ठरत नसल्याने आता दिवसाच्या कोणत्याही वेळेला थेट कौन्सिलर्सना भेटण्याची सोय वांद्रेवाला फाउंडेशनने केली आहे. अशा प्रकारचा देशातील हा पहिलाच प्रकल्प आहे.

परीक्षा आणि पालकांची भीती, प्रेमभंग, जीवनामधील नैराश्य, एकटेपणा, बेकारी अशा अनेक कारणांसाठी वय वर्षे आठपासून ७० हून अधिक वयाच्या व्यक्ती या हेल्पलाइनवर फोन करून मदत मागत आहेत. परीक्षा, प्रेम आणि नात्यांमधील तेढ ही मानसिक ताण वाढण्याची महत्त्वाची कारणे असल्याचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी यांनी सांगितलं.


मुंबई टाइम्स टीम

mumbaitimes@indiatimes.com